नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १३४ Issue - 134 | वार बुधवार दि. १ ऑक्टोबर २०२५ Blow- Wednesday Date 1 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ओला दुष्काळाच्या सर्व सवलती लागू

## दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना थेट मदत मिळणार; मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील बहुतांश जिल्ह्यात गेल्या १५ दिवसांत झालेल्या (ठळप) मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे (त्रीशीं) अतोनात नुकसान झालं आहे. त्यात, मराठवाड्यातील लातूर, धाराशिव, नांदेड, बीड, परभणी, संभाजीनगर जिल्हे आणि पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांची पिके पाण्यात गेली असून मोठा फटका शेतकऱ्यांना बसल्याचं दिसून येत आहे. त्या पार्श्वभूमीवर आज मंत्रिमंडळ बैठकीत काही निर्णय होणार का, याची अपेक्षा शेतकऱ्यांना होती. दरम्यान, मंत्रिमंडळ बैठकीत पूरस्थितीचा आढावा घेण्यात आला असून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्याचा पूर्ण प्रयत्न राहिल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर त्रूवपर्रीळी) यांनी जाहीर केले. तसेच, मॅन्यूअलमध्ये ओला दुष्काळ ही संकल्पनाच नाही, तरीही दुष्काळाच्या सर्व सवलती लागू केल्या जातील असे म्हणत एकप्रकारे ओला दुष्काळच जाहीर करण्यात आला आहे.




मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस म्हणाले की, राज्य मंत्रीमंडळ बैठकीत महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यात गेल्या काही दिवसांत अतिवृष्टी झाली आहे, यासंदर्भात आढावा घेतला असून ६० लाख हेक्टरवरती नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यासाठी, पहिल्या टप्प्यात आपण २११५ कोटी रुपये शेतकऱ्यांना वितरीत करण्याची कामे सुरू झाले आहेत. काही ठिकाणी पाणी असल्यामुळे योग्य प्रकारचा असेसमेंट घेता येत नव्हतं आणि म्हणून त्यांना अधिकचा वेळ आपण दिलाय पुढच्या दोन-तीन दिवसात ही सगळी माहिती पोहोचेल त्यानंतर शेतकऱ्यांना करावयाची मदत असेल. जसं की खरडून गेलेली जमीन आहे, त्याच्याकरता करायची मदत असेल विहिरींच्या संदर्भात करायची मदत असेल, घरांच्या संदर्भातली मदत असेल, तातडीची मदत जी आपण सुरू केली आहे, त्या संदर्भातले निर्णय असतील. वेगवेगळ्या प्रकारे ज्या ज्या प्रकारचं नुकसान झालेलं आहे, त्या सगळ्या नुकसानाच्या संदर्भात एक कॉम्प्रिएनसीव पॉलिसी तयार करून आणि ही सगळी जी काही मदत आम्ही करणार आहोत ही पुढच्या आठवड्यामध्ये घोषणा आम्ही करून आणि शक्यतो शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी त्यांच्या खात्यामध्ये ही मदत मिळाली पाहिजे अशा प्रकारचा प्रयत्न आम्ही करणार आहोत, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

दुसरं महत्त्वाचं म्हणजे, मंत्रिमंडळाने काही निर्णय घेतलेले आहेत. त्यामध्ये, सातत्याने ओला दुष्काळाची मागणी होत असते पण मॅन्युअलमध्ये ओला दुष्काळ कुठेही नाही. आजपर्यंत कधी ओला दुष्काळ जाहीर झालेला नाही तथापि आम्ही हा निर्णय घेतला की, ज्यावेळी दुष्काळ पडतो त्यावेळी ज्या ज्या उपाययोजना, सवलती आपण देतो त्या सगळ्या सवलती आता तशाच प्रकारची दुष्काळी टंचाई पडली आहे असं समजून त्या सगळ्या सवलती याही वेळी लागू करण्याचा निर्णय हा राज्याच्या मंत्रिमंडळाने घेतला आहे, अशी माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. त्यामुळे, जी काही मागणी होती की त्यावेळच्या सवलती लागू झाल्या पाहिजेत किंवा ओला दुष्काळ जाहीर करायचा अर्थ असतो की त्या सवलती लागू करा, तशा सगळ्या सवलती या लागू करण्याचा निर्णय हा राज्याच्या मंत्रिमंडळाने घेतलेला आहे. आता ही सगळी नुकसानाची आकडेवारी जमा होते की पूर्ण जमा पुढच्या दोन-तीन-चार दिवसात होईल. जसं मी सांगितलं लवकरात लवकर, पण कुठल्याही परिस्थितीत पुढच्या आठवड्याच्या आत आपल्याला या संदर्भातली संदर्भातला निर्णय घेणार आहोत आणि त्या संदर्भातली घोषणा आम्ही करू, असेही फडणवीसांनी स्पष्ट केले.

**कर्करोगावर मोफत उपचारासाठी योजना**

राज्याच्या मंत्रिमंडळाने आज अजून काही महत्त्वपूर्ण या ठिकाणी निर्णय केलेले आहेत. ज्याच्यामध्ये राज्याची एक सर्वंकष कॅन्सर सेवा पॉलिसी कॉम्पियन्स कॅन्सर केअर पॉलिसी आपण तयार केलेली आहे. या कॅन्सर केअर पॉलिसीच्या माध्यमातून राज्यातल्या सगळ्या जिल्ह्यांना कॅन्सरच्या उपचार हा उपलब्ध राहिला पाहिजे अशा प्रकारची याची रचना करण्यात आलेली आहे. यात सेंटर आणि एल थ्री सेंटरचं जाळ आपण तयार करत आहोत, जेणेकरून कोणालाही कॅन्सरसारख्या या बिमारीची ट्रीटमेंट मिळण्याकरता त्यांच्या जिल्ह्यामध्येच जवळपास महत्त्वाच्या गोष्टी उपलब्ध असतील, काहींना काही गोष्टींकरिता सेंटरला काही ठिकाणी जावं लागेल. पण, याच्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात कॅन्सरचे जे रोगनिदान आहे, त्याच्यावर उपचार आहेत. त्याची सुलभता आणि त्याची कॉस्ट कमी करणे हा याच्या पाठीमागचा उद्देश आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# बिहारमध्ये तब्बल ७.४२ कोटी मतदार; निवडणूक आयोगाकडून अंतिम मतदारयादी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पाटणा: बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने मंगळवारी अंतिम मतदारयादी जाहीर केली. त्यानुसार बिहारमध्ये ७ कोटी ४२ लाख मतदारांची नोंद झाली आहे. प्रारूप यादीतील मतदारांची संख्या याआधी ७.२४ कोटी एवढी होती.



मतदार याद्यांच्या विशेष सखोल पडताळणी मोहिमेनंतर (एसआयआर) अंतिम मतदारयादी मंगळवारी, ३० सप्टेंबर रोजी प्रकाशित करण्यात आली आहे. मतदार ींशीं. शलळ.सीं.ळप या लिंकवर क्लिक करून त्यांची नावे पाहू शकतात', अशी पोस्ट मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांच्या फेसबुक पेजवर केली आहे. अनुपस्थित, स्थलांतरित किंवा मृत म्हणून घोषित करण्यात आलेली सुमारे ६५ लाख नावे मतदारयादीतून वगळण्यात आल्यानंतर, प्रारूप यादीतील मतदारांची संख्या ७.२४ कोटी होती. 'एसआयआर' नंतर ४७ लाख मतदारांची नावे कमी झाली आहेत, हे विशेष. आयोगाने जारी केलेल्या निवेदनानुसार १ ऑगस्टला प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर जी नावे यादीत समाविष्ट करायची राहून गेली होती त्यापैकी २१ लाख ५३ हजार पात्र मतदारांची नावे अंतिम यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत.बिहार विधानसभा निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. भाजपप्रणित 'एनडीए'ला मतदान करण्याची शक्यता कमी असलेल्या मतदारांची नावे चुकीच्या पद्धतीने वगळणे हा 'एसआयआर'चा उद्देश आहे, असा आरोप विरोधी पक्ष करत आहेत. तथापि, 'एसआयआर' मोहीम घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी आवश्यक आहे. मात्र, या घुसखोरांना 'इंडिया' आघाडी संरक्षण देत असल्याचा आरोप भाजपने केला आहे.

# सोलापूर शहरात डॉल्बी सिस्टीम वापरास बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) - सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत २२ सप्टेंबर २०२५ ते ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री २४.०० वाजेपर्यंत सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ आणि धम्मचक्र प्रवर्तन मंडळाकडून आयोजित कार्यक्रमांमध्ये डॉल्बी व डीजे सिस्टीम वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे, अशी माहिती सोलापूर शहर पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांनी दिली.

ही बंदी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३(१) अन्वये लागू करण्यात आली असून प्रसिद्धी पत्रकाद्वारे याची माहिती देण्यात आली आहे.

मागील वर्षी सार्वजनिक उत्सव व मिरवणुकांदरम्यान डॉल्बी व डीजे सिस्टीममुळे काही नागरिकांना कान व छातीच्या त्रासामुळे अपंगत्व किंवा जीवितास धोका निर्माण झाल्याची प्रकरणे नोंदवली गेली होती. यासंदर्भात ज्येष्ठ नागरिक व सामाजिक संघटनांनी निवेदने सादर करत डॉल्बी सिस्टीममुळे होणाऱ्या शारीरिक दुष्परिणामांविषयी चिंता व्यक्त केली होती.

या पार्श्वभूमीवर, सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने ही बंदी लागू करण्यात आली असून कोणीही या आदेशाचा भंग केल्यास भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ नुसार शिक्षेस पात्र राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# ग्रामनिधीमधून मागासवर्गीयांच्या १५ टक्के खर्चात अनियमितता केल्याबाबत चौकशी करण्याचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : धाराशिव तालुक्यातील मौजे जवळे दुमाला येथे ग्रामसेवकाने ग्राम निधी मधून मागासवर्गीयाच्या १५% खर्चात अनियमितता केली असल्याची तक्रार श्री सुधाकर रणदिवे यांनी दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ रोजी गटविकास अधिकाऱ्याकडे केली होती केली होती. परंतु या प्रकरणी पंचायत समितीकडून चौकशी करण्यास विलंब केला जात असल्यामुळे पुनश्च श्री रणदिवे यांनी २१ मार्च २०२५ व २२ एप्रिल २०२५ रोजी गट विकास अधिकाऱ्यांना स्मरणपत्रे देऊन तात्काळ चौकशी करण्याची विनंती केली होती. त्यावरून गटविकास अधिकारी यांनी श्री. ढाकणे एस एस विस्तार अधिकारी यांना दि. १५/०७/२०२५ रोजी पत्र देऊन चौकशी करण्याचे आदेश दिले होते परंतु विस्तार अधिकाऱ्यांनी अद्याप चौकशी केली नाही त्यामुळे विस्तार अधिकारी हे चौकशीकामी विलंब करुन चौकशी करण्यास टाळाटाळ करीत असल्याची बाब श्री. रणदिवे यांनी गटविकास अधिकारी यांच्या निर्दशनास आणून दिली, त्यावरून गटविकास अधिकारी यांनी दि. २९/०९/२०२५ रोजी पुनश्च श्री ढाकणे एस एस विस्तार अधिकारी यांना सदर प्रकरणाची तात्काळ चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.




# कर्करोगाच्या उपचारासाठी धोरण निश्चित, 'महाकेअर'च्या माध्यमातून राज्यातील १८ रुग्णालयांमध्ये दर्जेदार उपचार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील कर्करोगग्रस्तांना दर्जेदार उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी महाराष्ट्र शासनाने सर्वसमावेशक कर्करोग सेवा धोरण निश्चित केले आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन स्थापन करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या माध्यमातून राज्यभरातील १८ रुग्णालयांमध्ये विशेषोपचार सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या धोरणानुसार कर्करोग रुग्णालयांची एल-१, एल-२ आणि एल-३ अशी त्रिस्तरीय रचना करण्यात आली आहे. टाटा स्मारक रुग्णालय हे एल-१ स्तरावरील शिखर केंद्र असेल. एल-२ स्तरावर ८ केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत, ज्यात छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, मुंबईतील जे. जे. रुग्णालय, कोल्हापूर, पुण्यातील बी.जे. मेडिकल कॉलेज तसेच नाशिक आणि अमरावतीतील सार्वजनिक आरोग्य विभागाची संदर्भ रुग्णालये यांचा समावेश आहे.

एल-३ स्तरावर अंबाजोगाई, नांदेड, यवतमाळ, सातारा, बारामती, जळगाव, रत्नागिरी, मुंबईतील कामा-अल्ब्लेस रुग्णालय आणि शिर्डी संस्थानचे रुग्णालय अशा ९ रुग्णालयांचा समावेश करण्यात आला आहे. या केंद्रांमध्ये रेडिओथेरपी, किमोथेरपी, शस्त्रक्रिया, पॅलेटिव्ह केअर, मानसिक आधार, औषधसुविधा तसेच संशोधन आणि पदव्युत्तर शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतील. एल-२ स्तरावरील रुग्णालयांमध्ये एमडी, एमएएस, डीएम-एमसीएच, डीएनबीसारख्या कोर्ससाठी फेलोशिप उपलब्ध होणार आहे.

महाकेअर फाऊंडेशनच्या माध्यमातून या केंद्रांना निधी, मनुष्यबळ आणि आवश्यक मार्गदर्शन दिले जाणार असून समन्वयासाठी कमांड अँड कंट्रोल सेंटर स्थापन केले जाईल. सुरुवातीला फाऊंडेशनला १०० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत कर्करोग रुग्णालयांना मिळणाऱ्या शुल्कापैकी २० टक्के निधी या फाऊंडेशनकडे वर्ग करण्यात येईल. तसेच उडठ, आंतरराष्ट्रीय संस्था आणि क्लिनिकल ट्रायल्सद्वारेही निधी उभारला जाणार आहे.

फाऊंडेशनच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री, उपाध्यक्षपदी उपमुख्यमंत्री राहणार असून आरोग्य, वैद्यकीय शिक्षण व वित्त विभागाचे मंत्री, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि तज्ज्ञ मंडळींचा समावेश असणार आहे.

भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (खउचठ) आणि राष्ट्रीय रोग डेटा केंद्र (छउऊखठ) यांच्या अहवालानुसार २०२५ पर्यंत राज्यातील कर्करोग रुग्णसंख्या २०२० च्या तुलनेत ११ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने हे धोरण राबवून राज्यातील कर्करोग उपचार व्यवस्थेत क्रांतिकारी बदल घडवण्याचा संकल्प केला आहे.

**राष्ट्रवादी नेते अनिल सावंत यांच्या शिष्टमंडळाने घेतली अधिकाऱ्यांची झाडाझडती**

**अधिकाऱ्यांवर लोकप्रतिनिधींकडून प्रश्नांची सरबत्ती**

# नागरी समस्यांचा निपटारा ! अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना मदत !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) : पंढरपूर शहरामध्ये अनेक नागरिक समस्या निर्माण झाल्या आहेत, अतिवृष्टीने हवालदील झालेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे करण्याकामी शासन आणि प्रशासन यांच्यामध्ये एकवाक्यता नाही , अतिवृष्टीने बाधित शहरातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी राष्ट्रवादी नेते अनिल सावंत , यांनी सोमवारी प्रशासकीय अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली. येथील प्रांताधिकारी, नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली.




शहरातील नागरिक आणि अतिवृष्टीने ग्रासलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ, नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. पंढरपूर शहरातील रस्ते पाऊस आणि दळणवळणामुळे खड्डेमय झाले आहेत. शहरात येणाऱ्या अवजड वाहनांमुळे , येथील नागरिकांची तारांबळ उडत आहे. अतिवृष्टीमुळे शहरातील काही झोपडपट्ट्यांमध्ये पावसाचे पाणी घरादारांमध्ये पसरले होते, या घरांचे पंचनामे तत्काळ करण्याची मागणी अनिल सावंत यांनी केली. पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांना या प्रश्नांची जाणीव करून दिली, याबाबत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी यावेळी त्यांनी केली.

पंढरपूर तालुक्यातील काही गावांमध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे येथील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. घरेदारे पाण्यात असल्यामुळे, मोठ्या आर्थिक नुकसानाचा सामना त्यांना करावा लागला आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावेत असा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. परंतु शासन आणि येथील प्रशासन यांच्या बोलण्यामध्ये एक वाक्यता नाही, असे पंचनामे करताना जाणवले आहे, याबाबत पंढरपूरचे प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्याशी चर्चा करून , महसूल प्रशासनातील अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना द्यावयास लावण्याचे काम राष्ट्रवादी नेते अनिल सावंत यांनी केले. प्रांताधिकारी ,तहसीलदार आणि नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्यात समन्वय घडवून आणल्याने , शहरातील नागरिक आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा फायदा होणार असल्याचे दिसून येत आहे.

शहरात येणाऱ्या अवजड वाहतुकीबाबत , पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांचीही भेट या शिष्टमंडळाने घेतली. यावेळी अवजड वाहतुकीबाबत घोडके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अंगुली निर्देश केला, आणि या शिष्टमंडळाचा मोर्चा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाकडे वळला. शहराबाहेर दिशादर्शक फलक लावण्याची जबाबदारी तुमची आहे , तुम्हाला हे काम पार पाडावे लागेल , असे या शिष्टमंडळाने कार्यकारी अभियंत्यास ठासून सांगितले.

याप्रसंगी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुभाष भोसले, नागेश गंगेकर, दीपक वाडदेकर, सुरेश नेहतराव, आदित्य फत्तेपुरकर, माऊली आबा काळे, अक्षय गंगेकर, अमर सूर्यवंशी, सतीश आप्पा शिंदे, सुमित ढेबे, श्याम गोगाव, अक्षय नवत्रे, गणेश माने, अनिता पवार, संगीता पाटील, आशा जमदाडे, गोकुळ धोत्रे, महेश अधटराव, किरणराज घाडगे, संतोष सर्वगोड यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## संपादकीय....

### भारतीय संघाचे कौतुक

आशिया कपच्या अंतिम फेरीत भारतानं पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवला. तिलक वर्माच्या आक्रमक खेळीच्या जोरावर भारतानं पाकिस्तानला पराभूत केलं. भारतानं आशिया कप जिंकताच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ट्वीट करत संघाचं अभिनंदन केलं होतं. मात्र, मोदींच्या ट्वीटमधील ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख पाकिस्तानला खटकला. नरेंद्र मोदी यांनी भारताच्या विजयाला ऑपरेशन सिंदूरशी जोडून टीमला शुभेच्छा दिल्या होत्या. त्यावर आता टीमचा कॅप्टन सूर्यकुमार यादवनं देशाचे नेते फ्रंटफूटवर येऊन फलंदाजी करतात हे खूप चांगलं वाटतं असं म्हटलं. भारतीय क्रिकेट टीमचा कॅप्टन सूर्यकुमार यादवनं नरेंद्र मोदींनी दिलेल्या शुभेच्छांबद्दल बोलताना म्हटलं की, चांगलं वाटलं जेव्हा देशाचे नेते फ्रंटफ ुटवर येऊन बॅटिंग करत आहेत. हे असं आहे , तेच स्वत: स्ट्राईक घेत धावा करत आहेत. हे पाहून चांगलं वाटलं, आणि जेव्हा सर पुढे उभे असतील तेव्हा निश्चितपणे खेळाडू मोकळेपणानं खेळतील. भारतानं पाकिस्तानला आशिया चषकाच्या फायनलमध्ये पराभूत केल्यानंतर आशिया क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसीन नक्वीच्या हस्ते आशिया कपची ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला होता. सूर्यकुमार यादवनं म्हटलं की, मी याला वाद म्हणणार नाही, लोकांनी ट्रॉफीचे फोटो इथे तिथे पोस्ट केले आहेत. मात्र, खरी ट्रॉफी तेव्हा असते जेव्हा तुम्ही लोकांचं मन जिंकता, जे लोक पडद्याच्या मागं काम करतात ते खरे ट्रॉफी आहेत. खरी ट्रॉफी मैदानावर या सर्व लोकांचं काम आणि प्रयत्न आहे, असं सूर्यकुमार यादवनं म्हटलं. सूर्यकुमार यादवनं म्हटलं की सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे पूर्ण देश आनंद साजरा करतोय. जेव्हा आम्ही भारतात परत जू तेव्हा खूप चांगलं वाटेल आणि आम्हाला चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा आणि प्रोत्सान मिळेल. भारतानं तिलक वर्माच्या शानदार अर्धशतकाच्या जोरावर पाकिस्तानला अंतिम फेरीत ५ विकेटनं पराभूत करत नवव्यांदा विजेतेपद मिळवलं. पूर्ण स्पर्धेत भारतानं एकही सामना गमावला नाही. पाकिस्तान आणि भारत आशिया चषकात तीन वेळा आमने सामने आले. भारतानं तीन सामन्यात पाकिस्तानला पराभूत केलं. भारताच्या विजयानंतर नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करत म्हटलं की ऑपरेशन सिंदूर खेळाच्या मैदानात, निकाल सारखाच, भारताचा विजय, आपल्या क्रिकेटपटूंना शुभेच्छा. भारतानं कॅप्टन सूर्यकुमार यादवनं आशिया कपमधून मिळणारं पूर्ण मानधन भारतीय सैन्य आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्यातीन पीडितांना दान करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानं एक्सवर पोस्ट करत म्हटलं की मी या मालिकेचं पूर्ण मानधन आपल्या सशस्त्र दलांना आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना दान करण्याचा निर्णय घेतला आहे.

# बाबासाहेबांनी दिक्षा दिली, आपण बौद्ध कधी होणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्म देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांच्या जिवनात काही फरक पडला का? काही परिवर्तन झाले का? याचे उत्तर द्यायचे तर हो.. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध दिला आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांच्या जिवनामध्ये अमुलाग्र बदल झाला. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व वैचारिक प्रगती होऊन विज्ञानवाद रुजायला सुरुवात झाली. मान, सन्मान व स्वाभिमान मिळाला. तथागत बुद्धांच्या धम्माचे आचरण करणारा प्रत्येक व्यक्ती हा जिवनात यशस्वी होऊन आनंदी व आदर्श जिवन जगतो यात कोणतीही शंका नाही. म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या एका धाडशी निर्णयामुळे येथील मानसाला सोन्याचे दिवस आले. एवढी ताकद तथागत बुद्धांच्या धम्मात आहे. मानवाच्या कल्याणासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वोतोपरी सर्व काम करून ठेवले आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कोणतेही विचार व कार्य घेतले तर ते मानवाचे व देशाचे कल्याण करणारेच आहे. फक्त मानवतेचा चष्मा डोळ्याला हवा मेंदू मध्ये विषमतेची घाण नसावी. बाबासाहेब यांनी धम्माची दिक्षा देऊन आम्हाला नवीन संस्कृती, नवीन संस्कार तर दिलेच पण नवीन जिवन पद्धती देऊन आमची आदर्श ओळख निर्माण करून दिली. म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्धांचा धम्म अनुसरून जनतेचा उद्धार केलाच. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांची जबाबदारी पार पाडून अत्यंत बिकट परिस्थिती मध्ये जेथे विषमता नसानसात भिनलेली होती, मान सन्मान हा तर अस्पृश्यांना माहितच नव्हता अशा वेळी ओळख निर्माण करून देणे म्हणजे क्रांतीच होय. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिक्षा दिली, आमची प्रगती झाली हे खर असतांना



मुख्य प्रश्न आहे की आम्ही बौद्ध कधी होणार? बरेच लोक म्हणतात आम्ही १४ ऑक्टोबर १९५६ ला बौद्ध झालो. पण वास्तविक पणे पाहिले तर २०२५ मध्येही आम्ही बौद्ध आहोत का? याची मिमांसा होणे गरजेचे आहे. स्वतःला बौद्ध म्हणून घेण्यासाठी प्रत्येकाने वेगवेगळे निषक लावले आहेत. फक्त घरात बुद्ध व बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो मुर्ती लावणारे ही म्हणतात आम्ही बौद्ध आहोत. काही लोक आम्ही विहारात जातो म्हणून स्वतःला बौद्ध समजतात. काही लोक आम्ही अंधविश्वास व थोतांड मानत नाही म्हणून स्वतःला बौद्ध समजतात, काही लोक दारू पित नाहीत म्हणून स्वतःला बौद्ध समजतात, काही लोक पुर्वी महार होतो पण आज स्वतःला बौद्ध समजतात. खरं पाहिले तर हा निकष बौद्ध असल्याचे किंवा तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी असल्याचे सिद्ध करते का? तर मुळीच नाही. बौद्ध होण्यासाठी माणसाला जागृत असुन तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर चालावे लागते. फक्त बोलुन बौद्ध होता येत. बोलण्यात एक व वागण्यात एक असेल तर तो धम्म विरोधी आहे हेच सिद्ध होते. मग बौद्ध कोणाला म्हणायचे? जो पंचशिलेचे पालन करतो तो बौद्ध. जो धम्मानुसार चालतो तो बौद्ध. जो डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आदर्श मानुन त्यावर मार्गक्रमण करतो तो खरा बौद्ध. तथागत बुद्ध, कोणत्याही प्रकारचा भेद, द्वेष मान्यच करत नाहीत. तथागत बुद्ध परिवर्तनासाठी संघ अर्थात संघटना अर्थात एकी यावरच विश्वास ठेवतात. मग आज आपण पंचशीलेचे पालन करतो का? आदर्श जिवनाचा व प्रगतीचा मार्ग म्हणजे पंचशील आहे. घरात बुद्ध आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो लाऊन, गाडी मध्ये फोटो लाऊन तिच गाडी बार च्या समोर उभी करून मद्य प्राशन करणारा आणि स्टेज वर भाषण देणारा कधीच बौद्ध असु शकत नाही. स्वतःच्या स्वार्थासाठी इतरांना लुटणारा आणि स्त्रियांकडे वासनेच्या नजरेने पाहणारा कधीच बौद्ध असु शकत नाही. तोंडात मावा, तंबाखू, गुटखा टाकून विहारात जाणारा बौद्ध असुन शकत नाही. बर बरेच लोक काही प्रमाणात पंचशीलेचे काटेकोर पण पालन करण्याचा धम्माच्या शिकवणुकी प्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतात त्यांचे खरोखर मनापासून अभिनंदन करावे वाटते. पण समाजात वावरतांना मुला मुलीचे लग्न करतांना मुला मुलींचे गुण न बघता पैसा आणि पोटजात बघुन लग्न करणारे लोक नेमकी कोणती समता मानत असतील हा गहन प्रश्न आहे. स्वतःला सुशिक्षित समजून हाय क्लास, मिडल क्लास, लो क्लास समजणाऱ्या लोकांना बुद्धांची समता फक्त बोलण्यातच पाहिजे का? हा बावना तो शहाना काय प्रकार आहे हा? पोटजाती बघून श्रेष्ठत्व किंवा पोटजाती बघून प्राधान्य देणारा व्यक्ती बौद्ध असुच शकत नाही. मग घरात घरावर, गाडी मध्ये किती मोठा फोटो, मुर्ती लावू दे तो बौद्ध होऊच शकत नाही. सामाजिक समस्या सोडवण्यासाठी समाजाचे एकसंघ असायला पाहिजे. एकजूट व एकी असायला पाहिजे. समाज परिवर्तन करण्यासाठी तथागत बुद्धाला संघाची गरज होती. आणि आज स्वतःला बौद्ध समजणारे वेगवेगळ्या संघटना सुरू करून विखुरले गेले. स्वतः ची झोळी भरण्यासाठी बुद्ध, बाबासाहेब व चळवळीचे नाव घेऊन जगण्याची वेळ आली. स्वतःच्या संघटना सुरू करून विखुरलेला समाज काहीच करू शकत स्वत:चा मान सन्मान व स्वाभिमान ही टिकवू शकत नाही. परंतु समाजाची एकसंघ एकजूट असेल तर समाजाची सर्वांगीण प्रगती करून प्रत्येक मानसाला सारख्या प्रमाणात लाभ मिळू शकतो हा बुद्धांचा इतिहास विसरणारे लोक बौद्ध कसे असु शकतात का? दरवर्षी विजयादशमी साजरी करण्यासाठी दिक्षाभुमीला वेगळे स्टेज, वेगवेगळे बँनर लागतात. वेगवेगळे स्टेज आणि बँनर लावून स्वतः स्टेजवर जाऊन संघं सरणं गच्छामी म्हणतात जिभ अडखळत का नाही. बेकी करून संघाला अर्थात बुद्धांच्या एकीला मी शरण जातो असे म्हणणे म्हणजे धम्मा सोबत केलेली गद्दारी नाही का? बौद्ध समजून पक्ष, संघटना, झेंडे व नेते वेगवेगळे करून मनुस्मृती चे पालन करणारे आणि विचार व आचणाने गुलाम असणारे लोक बौद्ध असु शकत नाहीत.

कित्येक शिकलेले लोक आजही अंधविश्वास, पाखंड व भोंदूगिरी वर विश्वास ठेवून वेगवेगळे कर्मकांड करतात, अज्ञानावर आधारित उपक्रम साजरे करतात, लग्नामध्ये हळदी पासून ते दारक दारिका असलेल्या मुलाला व मुलीला एवढे सजवतात, त्यातही अनेक प्रथा, कर्मकांड असतात की समोरचा बुद्धाचा अनुयायी आहे हे समजणेच मुर्खपणाचे ठरते. दरवर्षी विजया दशमी एका ठिकाणी येऊन वेगवेगळ्या स्टेजवर साजरी होत असेल तर आम्ही विजय नेमका कशाचा साजरा करतोय? धम्म स्विकारण्याचा उद्देश साध्य झाला का? अपवादात्मक उदाहरणे देऊन फक्त नियम सिद्ध करता येत असतो. अपवाद म्हणजे नियम नसतो. हे ज्याला समजले तो नक्कीच विचार करेल आपण अजूनही बौद्ध झालो नाही. आपण स्वतःला बौद्ध समजत असु, आपण बुद्ध बाबासाहेब यांचे नाव घेत असु पण आजही वैचारिक व वर्तनाच्या पातळीवर बौद्ध होणे बाकीच आहे. जर आम्ही बौद्धच झालो नाही तर दरवर्षी विजया दशमी आम्हाला साजरा करण्याचा नैतिक अधिकार आहे का? कारण विजया दशमी अर्थात धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन हा बौद्ध झालेल्या लोकांसाठी विचाराचा व आचरणाचा प्रचार प्रसारासोबतच समिक्षा करण्याचा दिवस आहे. जे धम्माला मलिन करू पाहत आहेत त्यांनी विजया दशमी साजरा करू नये. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दूरदृष्टी ठेवून धम्माची वाट आम्हाला दिली. आम्ही धम्माच्या वाटेने न जाता भलत्याच वाटेने जाऊन धम्मा मध्ये भेसळ करण्याचा प्रयत्न करत आहोत. कोणताही दिवस साजरा करताना त्या दिवसाचे महत्त्व समजून घेऊन त्यावर चिंतन मनन करून भविष्यात अजून काय नियोजन व परिवर्तन आवश्यक आहे यावर चर्चा व्हायला पाहिजे. पण सध्या जो तो येउन भाषण देऊन निघून जातो यामुळे ना चळवळ वाढत ना परिवर्तन होत. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दिक्षा जरी दिली असली तरीही अजून आपण बौद्ध झालो नाही. बौद्ध होण्याचा प्रामाणिक प्रयत्न करूया. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या धम्माचे महत्त्व समजून घेऊन धम्मानुसार वागण्याचा प्रयत्न करणाऱ्या, समाज संघटीत राहून स्वतः ची नाही तर समाजाची सामुहिक प्रगती व्हावी म्हणून फुल ना फुलाची पाकळी योगदान देणाऱ्या सर्वांना विजयादशमी च्या मंगलमय कामना..

– विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# धाराशिव जिल्ह्याचे सुपुत्र प्रसिद्ध ग्रामीण कथाकार आणि साहित्यिक प्रा. भास्कर चंदनशिव यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर/प्रतिनिधी : धाराशिव जिल्ह्याचे सुपूत्र प्रसिद्ध ज्येष्ठ ग्रामीण कथाकार प्रा. भास्कर तात्याबा चंदनशिव (वय८० वर्ष) यांचे आज पहाटेत दुखद निधन झाले आहे. चंदनशिव यांच्या दुःखद निधनामुळे ग्रामीण आणि आंबेडकरी साहित्य विश्वाची मोठी हानी झाली आहे.

प्रा. भास्कर चंदनशिव हे प्रसिद्ध ग्रामीण आणि दलित साहित्यिक होते, जे त्यांच्या वास्तववादी आणि मानवी दुःखावर आधारित कथालेखनासाठी ओळखले जात. त्यांचे विपुल साहित्य असून त्यांनी दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी आणि जनवादी विचारप्रवाहांना स्पर्श करणारी साहित्यकृती निर्माण केली आहे. 'जांभळ ढव्ह' आणि 'लाल चिखल' हे त्यांचे प्रसिद्ध कथासंग्रह आहेत. धाराशिव जिल्ह्यातील हासेगाव (ता. कळंब) येथील मूळ भास्कर देवराव यादव असलेले दत्तकविधानानंतर भास्कर तात्याबा चंदनशिव झाले. त्यांना दलितमित्र पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार, आचार्य अत्रे पुरस्कार, बी. रघुनाथ पुरस्कार यांसारखे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांनी अस्मितादर्श साहित्य संमेलन, मराठवाडा साहित्य संमेलन, आणि ग्रामीण साहित्य संमेलन यांसारख्या विविध संमेलनांचे अध्यक्षपद भूषवले. होते. प्रा. भास्कर चंदनशिव यांच्या दुखद निधना बद्दल अनेक मान्यवरांनी दुःख व्यक्त केले असून त्यांना श्रद्धांजली वाहिली आहेत.

सुयश मीडिया ग्रुप च्या वतीने ही त्यांच्या वर पुष्प चक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. आज हजारो मान्यवरांच्या साहित्य प्रेमींच्या आणि ग्रामीण जनतेच्या उपस्थितीत त्यांच्यावर शोकाकूल वातावरनाग अंत्यसंस्कार करण्यात आले.

# गोगाव गावचा अभिमान– उद्योगपती श्री महेश कलशेट्टी सावकारांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/वागदरी : श्री बसवेश्वर तरुण मंडळाच्या वतीने गोगाव गावातील सुपुत्र व उद्योगपती श्री महेश कलशेट्टी सावकार यांचा भव्य सत्कार करण्यात आला. केवळ वयाच्या ३० व्या वर्षी उद्योगक्षेत्रात भरारी घेऊन आपल्या गावाचे नाव दूरवर पोहोचवणाऱ्या महेशजींनी समाजाप्रती असलेली बांधिलकी कृतीतून दाखवून दिली आहे.





सत्कार प्रसंगी महेशजींनी गावातील तब्बल ६५ गरजू व्यक्तींना थेट आर्थिक मदत दिली. सुरुवातीला ३५ लोकांना मदतीचा विचार होता; मात्र गावाचा सखोल आढावा घेतल्यानंतर आणखी कुटुंबे अडचणीत असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

एक क्षणही विलंब न करता त्यांनी मदतीचा निर्णय दुप्पट करत ६५ कुटुंबांना मदतीचा हात दिला.

दानशूर वृत्ती म्हणजे केवळ देणगी देणे नव्हे, तर समाजातील दुःख जाणून त्यावर उपाय करण्याची तयारी ठेवणे – हे महेश सावकार यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले. त्यांच्या या उपक्रमामुळे गावात प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले असून तरुणांना सामाजिक कार्यासाठी नवी दिशा मिळाली आहे.

या कार्यक्रमाला गावातील मान्यवर, तरुण तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुंदर नियोजन व अंमलबजावणी केल्याबद्दल श्री बसवेश्वर तरुण मंडळाचे विशेष कौतुक करण्यात आले.

# अतिवृष्टी बाधित नागरिकांना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची मोलाची मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर / प्रतिनिधी



अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना व घरात पाणी शिरल्याने घराची पडझड झालेल्या पंढरपूर तालुक्यातील तपकिरी शेटफळ येथील कुटुंबांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष, उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी भेट देऊन तेथील अतिवृष्टी बाधित प्रत्येक कुटुंबांना राष्ट्रवादीच्या वतीने मोलाची मदत म्हणून जीवनावश्यक वस्तूंचे किट भेट देण्यात आले.

**अतिवृष्टीमुळे घरांची पडझड झालेल्या कुटुंबाशी राष्ट्रवादीचे नेते नागेश फाटे यांनी साधला संवाद**

यावेळी अतिवृष्टी बाधित नागरिकांशी संवाद साधताना नागेश फाटे म्हणाले की अतिवृष्टीमुळे अनेक कुटुंब उध्वस्त झाले आहेत. याची दखल प्रशासनाने घेऊन तातडीची मदत करणे गरजेचे होते. मात्र तसे होताना दिसत नाही. पुढील काळात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी राज्यातील प्रत्येक नागरिकांच्या पाठीशी उभी राहून सरकारला मदत करण्यास भाग पाडेल. असा विश्वास फाटे यांनी दिला.

याप्रसंगी नवनाथ बचुटे, गणेश दुरुतकर, डॉ. माणिकराव मस्के, तपकिरी शेटफळचे सरपंच महादेव मासाळ, ग्रामपंचायत सदस्य शंकर कांबळे, सत्यवान मासाळ, आरपीआय युवा अध्यक्ष अण्णासाहेब कांबळे,बिरुदेव मासाळ,दत्ताकांबळे,अरुण कांबळे,कोंडीबा मासाळ,निवास कांबळे,रुपेश कांबळे,संतोष कांबळे,सिद्राम मासाळ,हरिदास कांबळे, राजेंद्र रणदिवे, बाबासाहेब कांबळे, आनंदा कांबळे यांच्यासह महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

राज्यभरात अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली असून यामध्ये मोठ्या प्रमाणावर खरीप हंगामातील शेतातील उभ्या पिकांचे तसेच घरात पाणी शिरल्याने घरांची पडझड होऊन लाखो रुपयांचे नुकसान होऊन जनजीवन विस्कळीत झाले आहे.

प्रशासनाकडून पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. मात्र नुकसानग्रस्त नागरिकांना सणासुदीच्या तोंडावर तातडीची मदत देणे गरजेचे असताना याकडे शासन आणि प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. शासनाच्या मदतीची वाट न पाहता राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष अतिवृष्टी बाधित नागरिकांना मदत करण्यासाठी पुढे आला आहे.

याचाच एक भाग म्हणून पंढरपूर तालुक्यातील तपकिरी शेटफळ येथील अतिवृष्टीमुळे घरात पाणी शिरल्याने घरांची पडझड झालेल्या कुटुंबांना राष्ट्रवादीचे नेते नागेश फाटे यांनी भेट देऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने दैनंदिन जीवनात लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंचे किट प्रत्येक कुटुंबांना देण्यात आले आहे.

# अतिवृष्टीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने शासनाची आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार : आमदार राणा दादा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : परतीच्या पावसाने गेल्या पंधरा–वीस दिवसापासून सतत संततधार पाऊस पडून अतिवृष्टीने तुळजापूर तालुक्यातीलच नव्हे तर धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. अशा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाची तात्काळ अर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी तुळजापूर तालुक्यातील काही गावांच्या भेटी दौऱ्यात शेतकऱ्याशी व ग्रामस्थांची बोलताना केले.





तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांचे वडील माजी मंत्री डॉक्टर पद्मसिंह पाटील हे सध्या वर्धापकाळी आजारी आहेत. एका डोळ्यात वडील आजारी असल्याचे दुःख तर दुसऱ्या डोळ्यात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्याचे दुःख घेऊन आमदार राणाजगजितसिंह पाटील हे तुळजापूर तालुक्यातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या वागदरी, दहिटणा, गुजनूर,शहापूर, खुदावाडी,अणदूर व चिवरी पाटी आदी गावांचा पहाणी दौरा केला. या दौऱ्या दरम्यान ते शेतकऱ्यांशी बोलताना म्हणाले की पाऊस कमी झाल्यानंतर तातडीने शासकीय पातळीवर सर्व शेतकऱ्यांच्या शेतात बांधापर्यंत जाऊन पिक पंचनामा करून एकही शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेऊन लवकरात लवकर सर्व शेतकऱ्यांना तात्काळ शासनाची आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी मी प्रयत्न करणार असे सांगून त्यानी शेतकऱ्यांचे व ग्रामस्थांचे मनोधैर्य वाढवले.

या प्रसंगी भाजपचे अँड. दिपक दादा अलूरे, प्रभाकर मुळे,सिध्दू आण्णा कोरे, साहेबराव घुगे, विलास राठोड, माहादु सालगे किशोर धुमाळ, विवेकानंद मेलगिरी, दामाजी राठोड, भिवाजी, इंगुले, उमा गोरे, सचिन घोडके, हारिश पाटील, कल्याण बिराजदार सह शेतकरी ग्रामस्थ उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भातसा नदीच्या रौद्र रूपाने केला प्रचंड कहर


## अनेक गावांना जोडणारा पूल निम्मा वाहून गेला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर प्रतिनिधी/दिनेश घनघाव : दिनांक २६ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर रोजी झालेले अती मुसळधार पावसाने आधीच मोडकलीस आलेल्या शहा-पूर - सापगाव तसेच अनेक गावांना जोडणारा पूल वरून निम्म वाहून गेला.

हा पूल वरून वाहून गेल्याने पुलाची बिकट अवस्था निर्माण झाली आहे कोणत्याही क्षणी तो कोसळू शकतो, ह्या पुलाच्या मुळे शहापूर ला येणाऱ्या विद्यार्थी, तसेच कामा साठी येणाऱ्या नोकरवर्ग लोकांची तारेवरची कसरत सुरु झाली आहे.

अनेक वर्षा पासून हा पूल धोकादायक असल्याच दिसत होत, वरवर त्यावर डांबर टाकणे, खड्डे बुजवणे अशीच कामे चालू होती पण त्याला कायमच भक्कम कसा करता येईल ह्या कडे मात्र कोणाचं लक्ष जात नव्हतं.. ते लक्ष वेधून घेण्याचं काम अक्षरशः निसर्गाला करावी लागली आहे, मुंबई च्या काही हकेवर असलेला शहापूर तालुक्याची ही दैनिय अवस्था अत्यंत लाजिरवाणी वाटू लागली आहे, शैक्षणिक बाबतीत अग्रेसर असलेला शहापूर तालुका मात्र विकसाच्या बाबतीत मागे पडत आहे, वाहतुकीचे रस्ते तर अत्यंत खराब झाले होतेच आता त्यात हा पूल देखील जोडला गेला आहे, प्रशासन ने ह्या पुला बाबत ठोस निर्णय घेऊन नागरिकांनची होण-ारी कसरत थांबवावी.



# अतिवृष्टीमुळे रस्त्यांचे नुकसान; टाकळी–कासेगाव–अनवली मार्गावर सार्वजनिक बांधकाम विभागाची तातडीची दुरुस्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक भागांतील रस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, विशेषतः टाकळी-कासेगाव-अनवली मार्गावर पडलेले खड्डे आणि वाहतुकीस अडथळा निर्माण करणारी स्थिती लक्षात घेता सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांनी तात्काळ दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.



या मार्गाचा अवजड वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी कामाची तातडीने मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती उपअभियंता भीमाशंकर मेटकरे यांनी दिली.

तालुक्यातील नदीकाठच्या भागांतील रस्ते खराब झाले असून, भीमा नदीवरील काही पुलांचे भरावे वाहून गेले आहेत. त्यामुळे काही ठिकाणी संपर्क तुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी रस्ते दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर सुरू आहेत. नागरिकांना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी प्रशासन सतर्क असून, सर्व यंत्रणा कार्यरत आहेत.

# तुळजापूर तालुका सह धाराशिव जिल्ह्यातील सर्व तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा : रिपाइं (आठवले) ची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : अतिवृष्टीग्रस्त धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुका सह सर्व तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) तुळजा-पूर तालुका शाखेच्या वतीने धाराशिव जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

रिपाइं (आठवले) तुळजापूर तालुका शाखेच्या वतीने देण्यात धाराशिव जिल्हाधिकारी यांना अप्पर तहसिलदार नळदुर्ग यांच्या मार्फत देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की गेल्या पंधरा-वीस दिवसापासून धारा शिव जिल्ह्यातिल सर्व तालुक्यात सतत संततधार पाऊस येऊन अतिवृष्टीमुळे सर्व शेतकऱ्यांच्या शेतातील पिकात पाणी जाऊन खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाले असून शेतमजुरांच्या हातालाही काम नाही.त्यामुळे भूमि हीन शेत मजुरावर उपासमारीची वेळ आली आहे.तेव्हा धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर सह सर्व तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेत मजुरांना धान्य कीट व आर्थिक मदत द्यावी.तसेच गावोगावी घरांची पडझड झालेली आहे अतिवृष्टीमुळे अशा पडझड झालेल्या घरांची पाहणी करून त्या कुटुंबाला घराच्या दुरुस्तीसाठी शासनाने आर्थिक मदत करून त्यांचेआर्थिक व मानसिक पुनर्वसन करावे अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) तुळजा-पूर तालुका शाखेच्या वतीने अप्पर तहसिलदार नळदुर्ग मार्फत धाराशिव जिल्हा अधिकारी यांना करण्यात आली आहे. नळदुर्ग येथील अप्पर तहसील कार्यालयाचे तह-सीलदार यांच्या मार्फत धाराशिव जिल्हाधिकारी याना देण्यात आलेल्या निवेदनावर रिपाइं (आठवले)चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जिल्हा सचिव एस.के. गायकवाड,रिपाइं तुळजापूर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे, नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे,नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे, जेष्ठ कार्यकर्ते कैलास गुरुजी सह कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

# निफाड तालुक्यात आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त संवेदिकरण शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय नाशिक यांच्या आदेशानुसार, जिल्हा एड्स नियंत्रण पथक यांच्या सुच-नेनुसार तसेच उपजिल्हा रुग्णालय निफाडचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजीव तांभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित् IEC Campaign निफाड तालुक्यात दिनांक १२ ऑगस्ट २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ स्थानिक युवकांची कृती - शाश्वत विकास उद्दिष्टांसाठी आणि त्यापलीकडे या घोष वाक्य नुसार सदरील कालावधीत राबविण्यात आला.

या अभियानामध्ये उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील आयसीटीसी विभागातील समुपदेशक नितीन परदेशी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ पौर्णिमा कोंडके व स्टाफ नर्स मंगला बोरसे यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी तालुक्यातील ३० माध्यमिक शाळा, ५ महाविद्यालये व १० ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांशी तसेच ग्रामस्थांशी संवाद साधत जनजागृती केली असून या वेळी




किशोरवयीन जीवन कौशल्य कार्यक्रमाची ओळख, किशोरावस्था व वाढते वय, पौगंडअवस्था प्रजनन क्षमता व लैंगिक आरोग्य, शारीरिक आरोग्य समस्या व मादक पदार्थांचा दुरुपयोग, एचआयव्ही-एड्स व एसटीआय विषयक मूलभूत माहिती, महाविद्यालयांमध्ये दिलेले मार्गदर्शन, मानसिक आरोग्य समस्या व मादक पदार्थांचा दुरुपयोग, एचआयव्ही-एड्स संक्रमणाचे मार्ग व प्रतिबंधक उपाय, एचआयव्ही बाबत समज व गैरसमज, कलंक व भेदभाव निर्मूलन, आदी विषयांवर शाळा मध्ये जाऊन मार्गदर्शन केले असून, एच आय व्ही एड्स संक्रमणाचे मार्ग व उपाय, एच आय व्ही संदर्भातील समज व गैरसमज, भेदभाव व कलंक निर्मूलन,. आदी विषयांवर एचआयव्ही-एड्स कायदा २०१७, नुसार ग्रामपंचायतींमध्ये उप-स्थित राहून मोलाची मार्गदर्शन करण्यात आले ,. असून या अभियानातून विद्यार्थी व ग्रामस्थांमध्ये किशोरवयीन जीवन कौशल्य, मानसिक व शारीरिक आरोग्य, मादक पदार्थांचे दुष्परिणाम, समाजात एच आय व्ही एड्स आजाराबाबत असलेले समज-गैरसमज दूर करण्यात आले, समाजातील एच आय व्ही एड्स रुग्णाबाबत भेदभाव व कलंक भावना दूर होऊन एच आय व्ही एड्स टोल फ्री क्रमांक १०९७ बाबत जणजागृतीचा प्रसार उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील आय सी टी सी विभागाकडून करण्यात आला हे अभियान यशस्वीरीत्या करण्याकरिता आरोग्य विभाग,शाळा, महाविद्यालय व ग्रामपंचायत येथील कार्यरत मुख्याध्यापक, शिक्षक, प्राचार्य , प्राध्यापक, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, उक्ज, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका व आशा वर्कर यांचे सहकार्य लाभले

# पंढरीतील मुलभूत सुविधांच्या प्रश्नावरून प्रशासनाला दिले निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरा-तील नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नावर तात्काळ उपयोजना करण्याची मागणी करत सोमवारी विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी पंढरपूर नगरपरिषद मुख्याधिकारी, शहर पोलीस निरीक्षक तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याच्या निवेदन सादर केले,

शहराच्या वाढत्या लोकसंख्येसोबत रस्ते, नाले स्वच्छता, कचरा व्यवस्थापन व वाहतूक व समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे, असलेले आहेत या वारंवार लक्ष देऊन ही ठोस उपाय योजना होत नसल्याने नागरिक त्रस्त झाले असून या पार्श्वभूमीवर हे निवेदन देण्यात आले आहे.




निवेदनात प्रमुख मागण्या -

रस्त्याच्या खड्ड्याची समस्या, व शहरा-तील प्रमुख रस्ते, उपनगरी मार्ग तसेच अंतर्गत गल्लीबोळात असंख्य खड्ड्यांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साठवून अपघाताची शक्यता वाढते, त्यामुळे हे खड्डे तात्काळ आणि कायमस्वरूपी बुजवावीत अशी मागणी करण्यात आली.

स्वच्छता मोहीम गरज

शहरात नालेसफाई व रस्त्याची स्वच्छता वेळेवर होत नसल्याचे सर्वत्र अस्वच्छतेचे वातावरण आहे. त्यामुळे डेंगू, मलेरिया, कॉलरा, यासारख्या, आजारांच्या फायदा होण्याची धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे विशेष स्वच्छता मोहीम राबवून नेहमीच साफसफाई कापावी असे निवेदनाद्वारे नमूद करण्यात आली.

कचरा व्यवस्थापन

कचरा संकलन विल्हेवाट यंत्रणा कार्यक्रम नसल्याने अनेक भागात कचऱ्याची ढीग रस्त्यावर पडून राहतात ही स्थिती तातडीने बदलून आधुनिक कचरा व्यवस्थापन पद्धती अमलात आणण्याची मागणी झाली.

धार्मिक स्थळे व यात्रा मार्गावरील स्वच्छता पंढरपूर ते धार्मिक पर्यटन दृष्ट्या महत्त्वाचे शहर असल्याने यात्रा काळात मोठ्या प्रमाणावर गर्दी होते मात्र या ठिकाणी पुरुषा स्वच्छतेचे उपायोजना होत नाहीत. यात्रेकरूंना अडचणीतून मुक्त करण्यासाठी तातडीने स्वच्छतेसाठी विशेष पावले उचलण्याची मागणी करण्यात आली.

नाले पाणी व घरांचे नुकसान

ज्ञानेश्वर झोपडपट्टी, लक्ष्मी नगर, अंबाबाई पठाण भगवान नगर संत पेठ, दाळे गल्ली या भागात नालेपाणी घरी व दुकानदाराला दुकानात पाणी घुसले आहे या नागरिकांना त्वरित मदत व नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी करण्यात आली.

जिजामाता शॉपिंग सेंटर मधील व्यापाऱ्यांचे नुकसान येथील गाळामध्ये पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे पंचनामे करून व्यापाऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी निवेदनात केली आहे.

वाहतूक व बायपास रस्ते

शहरातील वाहतुकीची कोंडी वाढत असून नियोजनाच्या अभावामुळे नागरिकांना दररोज त्रास सहन करावा लागतो. शहर व ग्रामीण वाहतुकीसाठी योग्य नियोजन करून वाहतूक सुरळीत करावी असेच प्रलंबित बायपास व इतर महत्त्वाची कामे तातडीने पूर्ण करावीत ठोस पावले उचलावीत अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गट व सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी केलेली आहे असे निवेदनात म्हटले आहे.

अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले. हे निवेदन नगरपरिषद मुख्याधिकारी श्री महेश रोकडे, शहर पोलीस निरीक्षक श्री विश्वजीत घोडके, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता श्री अमित निमकर, पंढरपूरचे प्रांताधिकारी माननीय श्री सचिन इथापे यांनाही यावेळेस निवेदन करण्यात आले यावेळी शहरातील समस्या तातडीने सोडवण्यासाठी प्रशासनाने


उपस्थित मान्यवर.

याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुभाष दादा , भोसले, पंढरपूर मंगळवेढा शरद पवार पक्षाचे श्री अनिल दादा सावंत, तालुकाध्यक्ष प्रथमेश पाटील, आदित्य फत्तेपूरकर भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी, माऊली आबा काळे, अक्षय गंगेकर सुरेश नेहतराव, दीपक वाढदिवस, नागेश गंगेकर संदीप शिंदे सुमित ढेबे श्याम गोगाव सर, अक्षय नवत्रे, गणेश माने धनंजय मोरे, अनिताताई पवार, संगीता ताई पाटील, आशाताई जमदाडे, गोकुळ धोत्रे महेश आदटराव किरणराज घाडगे, संतोष सर्वगगोड, प्रशांत साळुंखे अमोल अटकळी सोमनाथ बादुले कार्तिक ढवळे अक्षय कुमार बंद पट्टे यांच्यासह विविध संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दि. ०४ ऑक्टोबर पर्यंत चालणार ही प्रक्रिया**

# डी.फार्मसी प्रथम वर्ष प्रवेशाचा कॅप राऊंड-१ येत्या बुधवार पासून सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


SVERI



पंढरपूरः गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित डी. फार्मसी (डिप्लोमा) महाविद्यालयात प्रथम वर्ष प्रवेश प्रकियेची पहिली फेरी (फर्स्ट कॅप राऊंड) येत्या बुधवार, दि. ०१ ऑक्टोबर २०२५ पासून सुरु होणार असून ती प्रक्रिया शनिवार, दि. ०४ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत चालणार आहे. स्वेरीच्या फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी.क्रमांक ६५०५) मध्ये कॅप राउंड-१ साठी ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची सोय केली आहे. स्वेरीच्या पहिल्या डिप्लोमा फार्मसी महाविद्यालयाला प्रचंड गर्दी होत असल्यामुळे आणि पालकांच्या मागणीनुसार मागील तीन वर्षांपासून अर्थात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून स्वेरी अंतर्गत असलेल्या बी. फार्मसी महाविद्यालयांतर्गत ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेने नवीन डी. फार्मसी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याचा डी.टी.ई. कोड- ६३९७ असा आहे. याठिकाणी देखील कॅप राउंड १ चे ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची सोय करण्यात आली आहे,' अशी माहीती श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट, पंढरपूरचे संस्थापक डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली.

सन २०२५-२६ मध्ये पदविका फार्मसी अर्थात डी. फार्मसी प्रवेशाकरीता यापूर्वीच ऑनलाईन रजिस्ट्रेशन फॉर्म भरणे, भरलेले अर्ज स्विकारुन कागदपत्रांची तपासणी, पडताळणी, अर्ज निश्चिती करणे आदी प्रक्रिया दिलेल्या अवधीत पार पडल्यानंतर आता येत्या बुधवार, दि. ०१ ऑक्टोबर पासून ते शनिवार, दि.०४ ऑक्टोबर पर्यंत प्रवेशाची पहिली फेरी (कॅप राउंड-१) चालणार आहे. यामध्ये आपल्याला योग्य महाविद्यालयाची निवड करावी लागणार आहे.

यासाठी विशेष अभ्यास करून कॅप राऊंड-१ चे ऑप्शन फॉर्म ऑनलाइन भरावेत. महाविद्यालय निवडताना महाविद्यालयात दरवर्षी होणारे प्रवेश संख्या, विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षेचे निकाल, अभ्यासासाठी सोय-सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग या बाबींचा प्रामुख्याने विचार करावा. विद्यार्थ्यांनी यासाठी अभ्यास करून करिअरच्या दृष्टीने योग्य महाविद्यालयाची निवड करणे गरजेचे आहे. या कॅप राउंडच्या चार दिवसात घेतलेला निर्णय हा करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा ठरणार आहे. ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना या पहिल्या फेरीचा लाभ घेता येणार आहे.

डी. फार्मसी प्रवेशाच्या पहिल्या फेरीची अलॉटमेंट यादी महाराष्ट्र शासनाच्या तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य (डी.टी.इ.) कक्षाच्या संकेतस्थळावर बुधवार, दि. ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणार आहे. पहिल्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची स्विकृती सोमवार, दि. ०८ ते बुधवार, दि.१० ऑक्टोबर २०२५ या दरम्यान करता येणार आहे. प्रथम वर्ष डी.फार्मसीच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी प्रा. एस.व्ही मंडवे (मोबा.क्र. ९९२१७६२७२८), प्रा. वृणाल मोरे (मोबा.क्र. ९६६५१९६६६६) प्रा.एस.व्ही कौलगी (मोबा.क्र. ७०५७६२३५५३) व प्रा. विकास देशमुख (मोबा.क्र. ९१७२९२१२५४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. स्वेरीचे संस्थापक डॉ. बी.पी. रोंगे यांच्या नियोजनबद्ध मार्गदर्शनाखाली प्राचार्य प्रा. सतीश मांडवे व प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली अभ्यासू शिक्षकांच्या सहकार्याने सदर प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे सुरू आहे. डी.फार्मसीच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशनसाठी मिळालेल्या विक्रमी प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर स्वेरीच्या दोन्ही महाविद्यालयात विद्यार्थी व पालकांची गर्दी होण्याची चिन्हे दिसत आहेत.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# पूरग्रस्त कुटुंबांना पुरवठा विभागामार्फत मोफत धान्य व जनावरांसाठी चारा वाटप

## ७ तालुक्यातील ४७१० कुटुंबांना २४९ क्विंटल गहू तर २५० क्विंटल तांदूळ वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांची तत्परता**

**आज रोजी पर्यंत ६ तालुक्यांना २०५ टन चाऱ्याचे वितरण**



सोलापूर (जिमाका) : सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या कुटुंबांना शासनाच्या वतीने मोफत अन्नधान्य व जनावरांसाठी चारा वाटप करण्यात येत असून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे अत्यंत तत्परतेने मोफत धान्य वाटपाची कार्यवाही करत आहेत.

जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी सर्व तहसीलदारांना तातडीने पूरग्रस्त कुटुंबांना गतीने धान्य वितरण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. यामध्ये प्रत्येक कुटुंबाला दहा किलो गहू व दहा किलो तांदूळ उपलब्ध केले जात आहे. तसेच शासनाच्या नुकत्याच घेतलेल्या निर्णयाप्रमाणे लवकरच प्रती कुटुंब तीन किलो तूर डाळ वाटप केले जाणार आहे, परंतु सद्यस्थितीत गहू व तांदूळ वाटप सुरू आहे. आज रोजी पर्यंत माढा, करमाळा, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, मोहोळ, अक्कलकोट व सांगोला या सात तालुक्यातील ४७१० कुटुंबांना २४९ क्विंटल गहू तर २५०.८० क्विंटल तांदूळ वाटप करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे जसे तहसीलदार यांच्याकडून बाधित कुटुंबाची माहिती मिळत आहे, त्याप्रमाणे पुरवठा विभागाकडून मोफत धान्य वाटप तात्काळ केले जात असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. सरडे यांनी दिली.

दि. २९ सप्टेंबरपर्यंत तालुकानिहाय धान्य वाटपाचा तपशील :

- माढा तालुका – २५४ कुटुंबांना – गहू – २३.६ व तांदूळ – २५.४ क्विंटल
- करमाळा तालुका – २२९ कुटुंबांना गहू २२.९० व तांदूळ – २२.९० क्विंटल
- उत्तर सोलापूर – ६९८ कुटुंबांना गहू ७० व तांदूळ – ९० क्विंटल
- दक्षिण सोलापूर – २३२६ कुटुंबांना गहू १२.२० व तांदूळ – १२.२० क्विंटल
- मोहोळ तालुका – ११४० कुटुंबांना गहू ११४ व तांदूळ – ११४ क्विंटल
- अक्कलकोट तालुका – ३ कुटुंबांना गहू ६ व तांदूळ – ६ क्विंटल

सांगोला तालुका – ६० कुटुंबांना गहू ०.३० व तांदूळ – ०.३० क्विंटल

बार्शी तालुका – माहिती संकलन प्रक्रियेत.

दि. ३० सप्टेंबरपर्यंत तालुकानिहाय जनावरांसाठी चारा वाटपाचा तपशील:–

– माढा तालुका – ९०.०७५ टन, – मोहोळ तालुका – ६४.८३७ टन, करमाळा तालुका – १० टन, दक्षिण सोलापूर – १२ टन, उत्तर सोलापूर – २० टन, अक्कलकोट तालुका – ९ टन असे एकूण २०५.९१२ टन चारा वितरीत करण्यात आला आहे. तर २१६ पॉईंट ३३ क्विंटल चारा शिल्लक असून मागणीप्रमाणे चारा पाठवला जात असल्याचे श्री. सरडे यनी सांगितले.

जिल्हा प्रशासन पूरग्रस्तांच्या मदतीसाठी कटिबद्ध असून अन्नधान्य व जनावरांसाठी चारा वितरणासोबतच इतर आवश्यक मदत ही पूरग्रस्तापर्यंत अत्यंत काळजीपूर्वक पोहोचवली जात आहे. एक ही नागरिक मोफत अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही या दृष्टीने नियोजन करण्यात आलेले आहे.

# पं.किर्तीकुमार वडषेसी यांच्या सुश्राव्य गायनाने नवरात्र संगीत महोत्सवाची सांगता



**श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या नियोजनाखाली संगीत कला रसिकांना सांगितिक मेजवानी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीक्षेत्र पंढरपूर:–श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने प्रतिवर्षाप्रमाणे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि सन्मा. सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली आणि कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके साहेब प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत साहेब लेखाधिकारी मुकेश आणेचा यांचे उपस्थितीत दिनांक २३ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर सात दिवस दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत चालू असणाऱ्या नवरात्र संगीत महोत्सवाच्या सांगतेच गायनपुष्प ख्यातनाम गायक पं.विनायक थोरवी यांचे शिष्य किर्तीकुमार बडषेसी बेंगलोर यांनी गुंफले.

सुरुवातीला पृथ्वीराज राऊत साहेब लेखाधिकारी मुकेश आणेचा, मेजर चंद्रकांत कोळी,संजय कोकीळ आणि कलावंतांच्या शुभहस्ते विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून झाली.सुरुवातीला बिनषड्ज रागामध्ये दोन बंदिशी आणि तराणा सादर केला त्यानंतर जय जय राम कृष्ण हरीच्या गजराने भक्तीमय वातावरण बनले आणि नंतर संतभार पंढरीत,सावळे सुंदर रूप मनोहर,तिर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल,अच्युतम केशवम ,भाग्यदा लक्ष्मी बारम्मा,आदी सुंदर अभंग सादर करत देव माझा मी देवाचा या भैरवीने कार्यक्रमाची सांगता करत अप्रतिम स्वरांनी रसिकांना अक्षरक्ष: मंत्रमुग्ध केले आणि पंढरपूरकरांसाठी ही गान–सेवा खास मेजवानी ठरली.त्यांना तितकीच सुंदर साथसंगत तबला अतुल ताडे हार्मोनियम वैभव केंगार पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे टाळ माऊली पिसे यांनी करत कार्यक्रमाला रंगत आणली.सुत्रसंचलन ज्ञानेश्वर दुधाणे सरांनी केले.यावेळी पंढरपूर कला रसिकांनी शेवटपर्यंत मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद दिला.हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती कर्मचारी वर्ग अधिक परिश्रम घेतले.सर्व कलारसिक श्रोत्यांनी अप्रतिम सांगितिक मेजवानी दिल्याबद्दल मंदिर समितीचे मनापासून आभार व्यक्त केले

# कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांमुळे पूरग्रस्तांचे सुरक्षित स्थलांतर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव

अतिवृष्टी मध्ये भातसा धरणातून केलेल्या पाण्याचा विसर्गामुळे भिवंडी तालुक्यातील सोर तर आदी गावांमध्ये शासकीय अधिकारी यांनी आपले कर्तव्य बजावले असून परिसरात कौतुक केले जात आहे.मातोश्री वृद्धाश्रम या वृद्धाश्रमात साधारण ७७ नागरिक व इतर स्टाफ होते गेटजवळ पाणी पोहोचले असल्याने सर्व नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर जवळच्या इमारतीत करण्या बाबत स्थानिक ग्रामपंचायत व महसूल प्रशासनाने सांगितले व तेथील नागरिक सुरक्षित स्थळी पोहचवण्यात आले.सोर येथील एका चाळीत पाणी शिरल्यामुळे जवळपास १७३ नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.



ग्रामपंचायत मार्फत बिस्कीट पाणी देण्यात आले व स्थानिक नागरिक लक्ष्मण कोलकाट यांच्यामार्फत त्यांच्या गाळ्यात सुरक्षित निवास व जेवणाची व्यवस्था करण्यात आली.तेथील ग्रामस्थ व ग्रामस्तरीय आशा वर्कर यांनी सदर नागरिकांना इतर सहकार्य केले.आन्हे येथील आदिवासी वाडीतील काही घरात पाणी शिरल्याने साधारण १५ नागरिकांना अजय पाटिल यांच्या मदतीने सुरक्षित जागी स्थलांतर करून जेवण्याची व्यवस्था करण्यात आली.डोहोळे येथील एका चाळीत अडकलेले जवळपास ३५ कामगार ग्रामपंचायत,महसूल विभाग व माजी सरपंच तथा विद्यमान ग्रामपंचायत सभासद सचिन घोडविंदे यांचे भाऊ तथा आन्हे येथील स्थानिक नागरिक संकेत घोडविंदे त्यांच्या सोबत त्यांचे एस.जी.ग्रुपचे सभासद व स्थानिक नागरिक यांच्या मदतीने बाहेर काढण्यात आले.तसेच एका घरात अडकलेले ६ ते ७ व्यक्ती यांचे पुर्ण कुटुंब स्थानिक नागरिक यांच्या मदतीने सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले.सदर वेळी उपसरपंच शुद्धोधन जाधव हे उपस्थित होते.तर मासे तलावाजवळील चाळीत वास्तव्यास असलेल्या १० कामगारांना ग्रामपंचायत अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी मिळून स्थलांतराचे आवाहन केले. एन.डी.आर.एफ. टीम फायर ब्रिगेड आल्यास कामगारांचे सुरक्षित स्थलांतर करण्यात येईल याबाबत पाठपुरावा सतत करीत होते. या सगळ्यात डोहोळे ग्राम पंचायत अधिकारी परेश सोनावणे,ग्राम महसूल अधिकारी नरसूबाबा तुगावे,सुदाम वाघे तसेच कोशिंबी येथील ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर ठाकरे व सर्व ग्रामपंचायत कर्मचारी हजर होते.

विशेष म्हणजे मध्यरात्रीच्या सुमारात सदर कर्मचारी हे अडकलेल्या ९ नागरिकांच्या सतत संपर्कात होते आणि सकाळी पाणी ओसरताच ते नागरिक सुखरूप आहेत याची प्रत्यक्ष भेटून खात्री करून निश्चिन्त झाले. आणि त्यानंतर ग्राम पंचायत कार्यालयात सेवा पंधरवडा अंतर्गत असणाऱ्या दाखले शिबीर याच्या तयारीला लागले.असे आलेल्या आपत्तीशी स्वतः सामना करणारे स्वतः फिल्ड वर उतरून जवळपास ३१७ नागरिकांना सुरक्षित स्थळी आहेत याची खात्री करून कर्तव्य बजावणारे व सामाजिक बांधिलकी जपणारे ग्रामपंचायत अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी या कर्मचारी यांचे सर्व परिसरात कौतुक केले जात आहे.

# श्री देवी लिंग मल्लिनाथ देवस्थान येथे कळसारोहण कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी : तालुक्यातील करजगी हंद्राळ रस्त्यावरील श्री देवी लिंग मल्लिनाथ देवस्थान येथे गुरुवार दि.२ ऑक्टोबर रोजी जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सद्गुरू श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात कळसारोहाण कार्यक्रम आयोजित केले असल्याची माहिती करजगीचे सरपंच विवेक उंबरजे यांनी दिली.

गेल्या वर्षी सुरेश धरेप्पा मूचंडे आणि त्यांचे धर्मपत्नी अनुराधा सुरेश मूचंडे या दाम्पत्यानी देवीलिंग मल्लिनाथ देवस्थान साठी ५ एकर जमीन मोफत दान दिले आहे. एका वर्षात भव्य मंदिराची उभारणी करून गुरुवार दि.२ ऑक्टोबर रोजी दसऱ्यांची शुभ मुहूर्तावर



कळसारोहन कार्यक्रम होणार असुन गुरुवार दि.२ ऑक्टोबर रोजी पहाटे श्री चे महा–पूजा, नवग्रह पूजा करण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता करजगी गावातून देवस्थान पर्यंत विविध वाद्य व सुहासिनीसह भव्य कळस मिरवणूक काढण्यात येणार.

गुरुवार दिवसभर देशभक्ती कार्यक्रम आयोजित केले असून या कार्यक्रम साठी करजगी, हंद्राळ, जेऊर, तडवळ,मंगरूळ या पंचक्रोशीतील भाविक भक्तांकडून जय्यत तयारी करण्यात येत आहे. तरी भाविक भक्तांनी सद्गुरुंचा दर्शन व महाप्रसादाचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन हंद्राळचे उद्योगपती तथा माजी सभापती मल्लिकार्जुन काटगाव यांनी केले आहे.

# स्वेरीमध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर– गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ‘राष्ट्रीय सेवा सप्ताह’ अंतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची १०९ वी जयंती साजरी करण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या सूचनेनुसार स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती निमित्त आयोजिलेल्या ‘एक दिन, एक घंटा, एक साथ’ राष्ट्र स्वच्छता अभियान आयोजित करण्याची सूचना देण्यात आली होती त्या अनुषंगाने स्वेरीमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी डॉ. यशपाल खेडकर यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनावर प्रकाश टाकत महत्वाची माहिती दिली. त्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा जीवनपट आणि राष्ट्र उभारणीसाठी केलेले महत्वपूर्ण योगदान सांगून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे ‘एकात्म मानव दर्शन’ हे विद्यार्थ्यांच्या समोर ठेवले. सदरचा कार्यक्रम स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमासाठी स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे, प्रा. कुलदीप पुकाळे, प्रा. गिरीश फलमारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेमधील विद्यार्थी व स्वयंसेवक उपस्थित होते.

**अनंत चैतन्य प्रशालेचे सहशिक्षक धनंजय जोजन साने गुरुजी आदर्श शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित**

**आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे प्रतिपादन**

# जगावर प्रेम करण्याची शिकवण देणाऱ्या मातृहृदयी साने गुरुजींच्या नावांने दिला जाणारा पुरस्कार हा शिक्षकांसाठी प्रेरणादायी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : मनमिळावू स्वभाव, तंत्रस्नेही, उपक्रमशील, प्रसंगी विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्याचे औदार्य दाखवणारे, शालेय कामकाजात तत्परता व सकारात्मक दृष्टीकोन बाळगणारे विद्यार्थी प्रिय गणित शिक्षक श्री. धनंजय शिवकांत जोजन यांना यंदाचा अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला तालुका शाखा अक्कलकोटच्या वतीने देण्यात येणाऱ्या साने गुरुजी आदर्श शिक्षक रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. टोपी, शाल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

कल्याणशेट्टी शिक्षण संकुल अक्कलकोट येथे पार पडलेल्या या सन्मान सोहळ्यात महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे अध्यक्ष, अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार व कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री.सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते श्री. धनंजय जोजन यांना सपत्नीक गौरवण्यात आले. यावेळी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मा. श्री.प्रशांत आरबाळे साहेब उपस्थित होते. साने गुरुजी हे पदवी घेऊन नोकरी करणारे पोटार्थी शिक्षक नव्हते तर ते व्रत म्हणून स्वीकारलेले मुलांना देवा घरची फुले समजून मुलांच्या निरागसतेतूनच त्यांना जीवनाचे धडे देण्याचे कार्य करणारे ज्ञानाचे



दीपस्तंभ होते .त्यांच्या नावांने दिला जाणारा पुरस्कार ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्यां शिक्षकांसाठी निश्चितच प्रेरणादायी असून या ठिकाणी आज पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या कार्याचा होणारा हा केवळ गौरवच नाही तर त्यांच्या कार्याचे हे संचित आहे असे गौरवोद्गार मा.आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी यावेळी केले.

विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी शिक्षकांशिवाय शिक्षणाची कल्पना होऊच शकत नाही तेंव्हा शिक्षकांनी अधिक जबाबदारीने व साने गुरुजींचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून समर्पणाच्या भावनेतून काम करण्याची खरी आवश्यकता असल्याचे प्रतिपादन करून पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे गटशिक्षणाधिकारी मा. प्रशांत आरबाळे साहेब यांनी अभिनंदन केले.या सोहळ्यात वेगवेगळ्या शाळेच्या एकुण अकरा पुरस्कर्त्यांना सन्मानित करण्यात आले.त्यापैकी प्रशालेचे सहशिक्षक श्री. धनंजय जोजन एक होते. यानंतर मुख्याध्यापक संघाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त प्रशालेचे पर्यवेक्षक श्री.ज्ञानदेव शिंदे व श्री.धनंजय यांना संस्थेच्यावतीने शाल, बुके व सोलापूरच्या श्री.सिध्दरामेश्वरांची प्रतिमा देऊन संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक श्री.मल्लिनाथ कल्याणशेट्टी सर व संचालक श्री. शिवप्पामामा भरमशेट्टी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य श्री.शिवशरण जोजन,अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेचे तालुकाध्यक्ष श्री. परमेश्वर होसूरे व सर्व पदाधिकारी,प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे, सौ. सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. मलकप्पा भरमशेट्टी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. बापूजी निंबाळकर, सेवानिवृत्त पर्यवेक्षक श्री.शिवानंद पुजारी, सेवानिवृत्त शिक्षक श्री. खंडेराव घाडगे, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री.अप्पासाहेब काळे, समस्त शिक्षक बंधू– भगिनी व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री. धनंजय जोजन यांचे प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ मा. श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका मा. सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती,सी.ई.ओ.सौ.रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी अभिनंदन करून शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.